जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
ईमेल :- cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र. ९८१९२०८२७९

प्रेस नोट दि.२५/०१/२०२५

# ‘‘ गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे ची उत्कृष्ठ कामगिरी ’’

## ‘‘बांगलादेशातुन अवैध्यरित्या भारतात प्रवेश करून वास्तव्य करीत असलेल्या ०५ बांगलादेशी नागरिकांना गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे यांच्या कडुन शिताफीने अटक’’

गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे येथील सहा.पोलीस निरीक्षक अब्दुल मलिक यांना त्यांच्या बातमीदारा कडुन मिळालेल्या बातमीच्या आधारे गुन्हे शाखा, घटक-१, ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२५/०१/२०२५ रोजी इकडील नेमणुकीतील पोलीस पथकाने उत्तरशिव नाका, उत्तरशिव, पोस्ट-पडले, ता.जि.ठाणे याठिकाणी बिगारी कामाच्या शोधात आलेल्या तसेच बांगलादेशातुन अवैध्यरित्या भारतात प्रवेश करून वास्तव्य करीत असलेल्या ०५ बांगलादेशी नागरीकांना शिताफीने ताब्यात घेतले. नमुद ०५ बांगलादेशी नागरिकांकडे केलेल्या चौकशीअंती त्यांच्या कडे भारतीय नागरिक असल्याचा कोणताही पुरावा नसल्याने तसेच ते बांगलादेशी नागरिक असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने नमुद इसमांना ताब्यात घेउन त्यांच्याविरूध्द् शिळ-डायघर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

**नमुद कारवाई श्री. अमरसिंह जाधव, पो. उप आयुक्त, गुन्हे, ठाणे श्री. शेखर बागडे, सपोआ, शोध-१, गुन्हे शाखा, ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि/सचिन गायकवाड, सपोनि/अब्दुल मलिक, ग्रेड पोउपनिरी/रविंद्र पाटील, सपोउपनिरी/अजय फराटे, सपोउपनिरी/नरसिंग महापुरे, सपोउपनिरी/दयानंद नाईक, पोहवा/४८१७ प्रशांत निकुंभ, पोना/७३७५ बडगुजर, चापोहवा/३८१ शशिकांत सावंत, सर्व नेम. गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे,यांच्या पथकाने केली आहे.**